
ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

ISSN 2277-5730

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR
/ INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi Part - II | January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

एस० आर० छट्टीमणी

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३८ | पंडित नेहरुंचे लोकशाही समाजवादासंबंधी विचार<br>**प्रा. डॉ. अरुण मुकुंदराव शेळके** | १४४-१४६ |
| ३९ | देशाच्या उज्ज्वल विकासासाठी बालसंस्कार ही काळाची गरज<br>**जयश्री त्र्यंबकराव कात्रे** | १४७-१५२ |
| ४० | महाराष्ट्रातील स्त्री शिक्षण एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. संजय सांभाळकर** | १५३-१५७ |
| ४१ | हिंगोली जिल्हातील माध्यमिक शाळेतील क्रीडा सोयी आणि सुविधा यांचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**डॉ.ज्योतीराम देवसींग चव्हाण**<br>**डॉ.मुरलीधर शंकरराव राठोड** | १५८-१६१ |
| ४२ | संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे स्वरुप<br>**डॉ. एस. आर. कट्टीमनी** | १६२-१६७ |

VOLUME - VIII, ISSUE – I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ४२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे स्वरुप

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

## ऐतिहासिक पार्श्वभुमी

महाराष्ट्राला प्राचीन कालखंडापासुन ऐतिहासिक पार्श्वभुमी लाभली आहे. प्राचीन काळात सातवाहन काळापासुन ते आधुनिक काळात पेशव्यांच्या साम्राज्यापर्यंत महाराष्ट्राला ऐतिहासिक ओळख आहे. इंग्रजांच्या विजयानंतर ग्रँट डफने असे म्हटले होते की, इंग्रजांनी हिंदुस्थान हा मुघलांकडुन नव्हे तर मराठयांकडुन जिंकुन घेतला.

मोगल साम्राज्याच्या अस्तानंतर भारतामध्ये अनेक लहान-मोठ्या स्थानिक सत्तांचा उदय झाला. याच संधीचा फायदा घेत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने व्यापाराच्या प्रसाराबरोबरच स्थानिक सत्ताधिशांनी संघर्ष करीत त्यांचा पराभव करून ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला. हजारो वर्षांच्या बुरसटलेल्या सामाजिक व धार्मिक प्रथा, परंपरांना व अंधश्रद्धांनी भारतीय समाजाच्या विकासाची सर्व दारे बंद केली होती. शिक्षण व विज्ञान-तंत्रज्ञानाचा अभाव हे देखील भारतीयांच्या विकासातील प्रमुख अडथळे होती. स्त्रीयांचे व अस्पृश्यांचे जीवन हे गुलामाच्या जीवनापेक्षा कमी नव्हते.

अशा काळात ब्रिटिशांनी भारतीयांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या बदलामुळे भारतीय समाजात मध्यम वर्गीय नवशिक्षित समाज सुधारकांचा वर्ग निर्माण झाला. यांनी लोकांमध्ये सामाजिक समता व राष्ट्रवादीची प्रखर भावना निर्माण करण्याचे काम केले. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, देवेंद्रनाथ टागोर या सारख्या समाज सुधारकांनी भारतीय समाज व संस्कृतीला आलेली मरगळ दुर करण्याचे काम केले.

महाराष्ट्राची वैशिष्टये म्हणजे मराठी भाषा, वारकरी संप्रदाय, ऐतिहासिक परंपरा व राजकीय नेत्यांची परंपरा या वैशिष्टयांमुळे महाराष्ट्राला स्वत:चे वेगळे व्यक्तिमत्व प्राप्त झाले. प्रा. विठ्ठल वामनराव ताम्हणकर यांनी १९१७ मध्ये लोकशिक्षण मासिकात लिहलेल्या एका लेखात मुंबई प्रांत, व-हाड , मध्यप्रांत, हैद्राबाद संस्थान अशा ठिकाणी विभागलेला मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणुन एकसंघ महाराष्ट्राची निर्मिती करावी असा विचार मांडला. भाषावार प्रांताच्या मागणीस भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने इ. स. १९२० मध्ये नागपुर येथील अधिवेशनात प्रथम मान्यता दिली. १९२८ च्या नेहरु अहवालात भाषावार प्रांत रचनेची मागणीचा अंतर्भाव केला. नंतरच्या काळात विनोबा भावे, धनंजय गाडगीळ, प्रबोधनकार ठाकरे, माडखोलकर, दत्तावामन पोतदार इ. नेत्यांनी स्वातंत्र्यपुर्व काळात, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेची मागणी केली. यातुनच संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा परिचय समाजास व्हावा या हेतुने प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन केले आहे.

## संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

१६ ऑक्टोबर १९३८ मध्ये मराठी साहित्य संमेलनामध्ये व-हाड सह एकभाषीय राज्य, हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा, गोंमतक या प्रदेशासह महाराष्ट्राची निर्मिती करावी अशी मागणी केली.१९३९ मध्ये नगर साहित्य संमेलनात मराठी भाषीक प्रदेशांचा जो प्रांत बनेल त्याला संयुक्त महाराष्ट्र असे नाव दयावे असे ठरवण्यात आले.

संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना

१९४० मध्ये शामराव देशमुख यांच्या अध्यक्षते खाली संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना केली. या संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेस म. गांधीनी पाठींबा दिला. १९४३ मध्ये बेळगावात मराठी साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होई पर्यंत मराठवाडा, गोमंतक इ. प्रदेशांना संपुर्ण स्वायतत्ता दयावी. सीमा भागातील बेळगाव, कारवार, बिदर, छिंदवाडा, गुलबर्गा येथील जनतेचा कौल घेऊन कोणत्या प्रांतात सामील व्हावे ते ठरवावे. येथुनच संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाला सुरुवात झाली. या समितीचे उद्देश भाषावार प्रांत रचना करावी हा होता.

संयुक्त महाराष्ट्र परिषद

मुंबई मध्ये सर्वपक्षीय एकीकरण परिषद २८ जुलै १९४६ रोजी भरविण्यात आली. महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षाचे नेते, सार्वजनिक कार्यकर्ते, साहित्यीक, विचारवंत मोठया प्रमाणावर उपस्थित होते. या परिषदेने संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन केली. शंकरराव देव यांची अध्यक्ष म्हणुन तर ग. त्र्यं. माडखोलकर याची सचिव म्हणुन निवड करण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने १९४६ ते १९५५ पर्यंत स्वतंत्रपणे मराठी भाषिकांचे प्रतिनिधीत्व केले. या परिषदेने दोन ठराव केले.

१. सर्व सलग मराठी भाषिकांच्या प्रदेशांचा एकच भाषिक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापन करावा.

२. मराठी भाषिक प्रांत बनवताना मुंबई, व-हाड, विदर्भ, मराठवाडा, गोमंतक या मराठी भाषिक प्रदेशाचा विचार करावा. तसेच नवीन संयुक्त महाराष्ट्रात लोकशाही समाजवादी तत्वे स्थापन करणे. सामाजिक , आर्थिक क्षेत्रात समता प्रस्थापित करणे अशी उद्दीष्टये ठरविण्यात आली.

दार कमिशन (१९४७)

भाषावार प्रांत रचनेचा प्रश्न भारतीय घटना समिती समोर आणावा असा आग्रह मुंबई, व-हाड, मध्यप्रदेश येथील मराठी सदस्यांनी केला आणि भाषावार प्रांत निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरानी घटना समिती पुढे एखादया कमिशनची नियुक्ती करावी अशी मागणी केली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनाही भाषावार प्रांत रचनेबद्दल सहानुभूती वाटत होती. त्यामुळे त्यांनी एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली दार कमिशन नियुक्त केले.

१. भाषावार प्रांत रचना करावी की नाही ?

२. भाषावार प्रांत रचना करताना कोणकोणते व कसे कसे प्रांत बनवावेत.

कमिशनने या संबंधी चौकशी करुन अहवाल सादर करावा. या कमिशनपुढे मराठी नेत्यांनी मुंबईसह मराठी भाषिकांचा प्रांत असावा अशी मागणी केली. परंतु दार कमिशनने भाषावार प्रांत रचना ही भारताच्या एकात्मतेस , ऐक्यास मारक ठरेल असा अहवाल दिला. या अहवालानंतर महाराष्ट्रात तीव्र आंदोलनास सुरुवात झाली.

अकोल्याची बैठक (८ ऑगस्ट १९४७)

संयुक्त महाराष्ट्राची मागणी एक मुखाने दार कमिशन पुढे मांडण्यासाठी व त्यावर विचार करण्यासाठी अकोला येथे कार्यकर्त्यांची बैठक झाली. व-हाड, विदर्भ, नागपुरकर नेत्यांच्या मनात महाराष्ट्राच्या एकीकरणाबद्दल शंका राहु नये आणि संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस पाठींबा दयावा म्हणुन अकोल्याची बैठक बोलावुन त्या बैठकीत महत्वपुर्ण ठराव करण्यात आले.

१. संयुक्त महाराष्ट्र एक प्रांत राहुन त्यामध्ये मध्य प्रांत, व-हाड मधील मराठी भाषा बोलणा-यांचा प्रदेश महाराष्ट्राचा उपप्रांत ठेवावा.

२. उपप्रांतात वेगळे कायदे मंडख, मंत्रीमंडळ असावे.

३. संपुर्ण प्रांतासाठी एक गर्व्हनर, एक डेप्युटी गर्व्हनर असावा. त्यांची निवडणुक सर्व प्रांतातुन घ्यावी.

४. लोकसंख्येच्या प्रमाणात कायदे मंडळात प्रतिनिधी असावे.

५. उप प्रांताची निवडणुक व हायकोर्ट वेगळी असावी. या कराराप्रमाणे जर संयुक्त महाराष्ट्र निर्माण केला नाही तर महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण करावा असे ठरविण्यात आले.

जे.पी.व्ही. समिती : (२९ डिसेंबर १९४८)

मराठी जनता दार कमिशनला स्विकारणार नाही असे लक्षात आल्यावर या संदर्भातील सर्व परिस्थीतीही जयपुर अधिवेशनात या कमिशनवर चर्चा झाली. तेव्हा भाषावार, प्रांत रचनेचा विचार करण्यासाठीपंडीत नेहरु, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सितारामय्या यांची समिती नेमली. शंकरराव देव व जे. पी. व्ही यांची चर्चा होऊन मुंबईसह महाराष्ट्र ही मागणी समितीने फेटाळली. जे.पी.व्ही समितीने पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.

१. भाषावार प्रांत रचना करणे कॉंग्रेसला तत्वतः मान्य आहे पण तसे करण्याची आजची वेळ नाही.

२. मराठी भाषिक लोकांना महाराष्ट्र प्रांत हवा असेल तर तो केला जाईल पण मुंबई शहराचा समावेश महाराष्ट्रात केला जाणार नाही. या समितीच्या शिफारशी महाराष्ट्रावर अन्याय करणा-या आहेत. हे महाराष्ट्रातील नेत्याच्या लक्षात येताच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र चळवळीस जोर चढला. मुंबई महानगरपालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव प्र. के. अत्रे यांनी मांडले. भाषिक तत्वावर आंध्रपदेश हे पहिले राज्य स्थापन झाले. तेव्हा महाराष्ट्र विधान सभेत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव यशवंतराव मोहितेनी सादर केला. यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला जोर आला.

नागपुर करार

संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ठ केलेल्या सर्व विभागांना समान दर्जा प्राप्त करुन देणारा एखादा करार निर्माण करण्याची आवश्यकता नेत्यांना भासु लागली. महाराष्ट्रातील निरनिराळया प्रदेशांचा मागासलेपणा विचारात घेऊन त्या प्रदेशाच्या सर्वांगिण विकासावर जास्तीत जास्त भर दिला जाईल असे स्पष्ट करणारा मुलभूत स्वरुपाचा करार करावा. यातुनच नागपुर करार अस्तित्वात आला. यानुसार महाराष्ट्रातील प्रमुख नेते नागपुर येथे एकत्र आले. मराठी भाषिकाचे सर्वांगिण विकासावर भर देण्याचे ठरवण्यात आले यालाच नागपुर करार असे म्हणतात.

१. मराठी भाषिक प्रांतातील निरनिराळया विभागात राहणा-या लोकांचे एक राज्य व्हावे.

२. मुंबई, मध्यप्रदेश, हैद्राबाद राज्यातील सर्व सलग मराठी भाषिक प्रदेशांचे मिळुन एक राज्य निर्माण करावे त्याची मुंबई ही राजधानी असावी.

३. विकासाच्या व राज्यकारभाराच्या दृष्टीने महाविर्दभ , मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र असे तीन विभाग करावेत.

४. विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात मंत्री मंडळात व शासन यंत्रणेत प्रतिनिधीत्व दयावे.

५. मराठवाडा अविकसीत असल्यामुळे त्यांचा सर्वांगिण विकास घडवुन आणण्याकडे विशेष लक्ष दयावे.

६. मुंबई येथे उच्च न्यायालय असावे तर दुसरे नागपुर येथे असावे.

७. नागपुर ही महाराष्ट्राची उपराजधानी असावी. राज्याच्या विधान सभेचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी नागपुरला घ्यावे.

नागपुर येथे झालेल्या या करारामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे राज्य निर्माण होण्यास मदत झाली. या कराराचे श्रेय, भाऊसाहेब हिरे यांना दिले जाते. तसेच यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे, देवीसिंग चव्हाण, सौ. प्रभावती जकातकर, रामराव देशमुख,रा. कृ.पाटील, ए. का. देशमुख यांनी सह्या केल्या.

**एस फाजल अली कमिशन : (१९५३)**

भारतातील पहिले भाषिक राज्य हे आंध्रप्रदेश बनले. यामुळे भाषावार प्रांत रचनेच्या चळवळीस जास्तच जोर चढला. भारत सरकारने भाषिक तत्वावर प्रांताची फेररचना करण्यासाठी एस फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली २९ डिसेंबर १९५३ मध्ये राज्य पुर्नरचना आयोगाची स्थापना केली यालाच फाजल अली कमिशन असे म्हणतात . या आयोगात श्री. हृदयनाथ कंझुरु , सरदार के. एम. पण्णीकर यांची सदस्य म्हणुन नियुक्ती केली गेली. १ ऑक्टोबर १९५५ रोजी हा अहवाल प्रसिध्द झाला.

१. महाविदर्भाचे स्वतंत्र राज्य असावे.

२. कन्नड भाषिक जिल्हे वगळुन मराठवाडा धरुन सर्व गुजराती प्रदेशासह मुंबईचे वियापीठ राज्यनिर्माण करावे.

या अहवालामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. मुंबईत तीव्र आंदोलन सुरु केले. मुंबई सह महाराष्ट्र मागणी मान्य न झाल्यास सर्व मराठी आमदार, खासदार, मंत्री यांनी राजीनामा दयावाअशी मागणी केली. मुंबई सह महाराष्ट्र हे आंदोलन अधिकच तीव्र करण्यात आले.

**त्रिराज्य योजना**

फाजल अली कमिशनच्या अहवालानंतर महाराष्ट्रातील परिस्थिती स्फोटक बनली.यावेळी महाराष्ट्रातील कॉंग्रेस नेते , गुजरात मधील कॉंग्रेस नेते यांनी त्रिराज्य योजना सुचवली. ८ नोव्हेंबर १९५५ रोजी कॉंग्रेसने त्रिराज्याचा ठराव पास केला.

१. संपूर्ण गुजराती भाषिकांचे एक राज्य.

२. मुंबई शहर व तिची उपनगरे यांचे १०० चौ.कि.मी. चे स्वतंत्र राज्य

३. विदर्भ मराठवाडासह महाराष्ट्रही योजना कॉंग्रेसने माडली.

त्रिराज्य योजना मोरारजी देसाई यांनी विधानसभेत मांडली. या योजनेला कॉंग्रेस सह सर्व नेत्यांनी विरोध केला. सेनापती बापट, कॉ. डांगे यांनी विधानसभेचा भव्यमोर्चा काढला. मुंबईत पोलिसांनी गोळीबार केला त्यात १५ लोक ठार तर ३०० जखमी झाले. कॉंग्रेस पक्षाच्या १०० आमदारांनी राजीनामा दिला. यशवंतराव चव्हाण यांनी त्रिराज्य योजनेला विरोध केला.

**संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना : (१९५६)**

त्रिराज्य योजनेचा ठराव महाराष्ट्रातील जनतेने फेटाळला. म्हणुन पंडीत नेहरुनी मुंबई केंद्रशासीत प्रदेश करण्याचे ठरविले. त्यामुळे मुंबई मध्ये तीव्र आंदोलनास सुरुवात झाली. पोलिसांनीकारवाई करुन ९० जनांचा बळी घेतला. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात एकुण १०५ जणांचा हुतात्माम्हणुन बळी गेला.या पार्श्वभु मिवरच ६ फेब्रुवारी १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यातआली. मुबई सह संयुक्त महाराष्ट्र निर्मिती हेच समितीचे ध्येय ठरवण्यात आले.

१. भाषावार प्रांत रचनेच्या तत्वावर मराठी भाषिकांचे एक सलग राज्य निर्माण करणे.

२. लोकशाही, समाजवादी महाराष्ट्राची निर्मीती करणे

३. राजकीय, सामाजिक, आर्थिक समता प्रस्थापित करुन महाराष्ट्राच्या आर्थीक जीवनाची सहकारी तत्वावर मांडणी करणे.

ग.त्र्यो. मांडखोलकर, भाई डांगे, आचार्य अत्रे, मधु दंडवते, प्रबोधनकार ठाकरे यांनी समितीमध्ये पुढाकार घेतला. संयुक्त महाराष्ट्र समितीने सत्र आंदोलन केले. समितीच्या कार्यकर्त्यांनीदिल्लीत मोर्चा काढला. मुंबई, बेळगाव, कारवार, निपाणी सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशीमागणी परिषदेने केली. तेव्हा नेहरुनी द्विभाषीक मुंबई राज्याची निर्मिती केली.

द्विभाषिक राज्याची निर्मिती

१ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषीक मुंबई राज्याची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाण हे या राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनले. गुजरातला मंत्रीमंडळात स्थान देण्यात आले. परंतु या दोन्ही राज्याचा द्विभाषीक राज्याला विरोध होता. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्याचा पराभव झाला. स्वतंत्र राज्याच्या मागणीचा जोर वाढत चालला. महाराष्ट्र व गुजरातची निर्मिती झाली नाही तर काँग्रेसचे अवघड झाले असे इंदिरा गांधींना पटले. तसेच यशवंतराव चव्हाण यांनी द्विभाषिक राज्याला विरोध केला.तेव्हा मुंबई सह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीस पंडीत नेहरुनी मान्यता दिली. याचे श्रेय यशवंतराव चव्हाणव संयुक्त महाराष्ट्र समितीस दयावे लागते.

मुंबई पुनर्रचना कायदा : (१९६०)

केंद्र सरकारने गुजरात व महाराष्ट्र राज्याच्या भाषावार प्रांत रचनेस अनुमती दिल्यानंतर प्रादेशिक व वित्तीय देवाण घेवाण संदर्भात चर्चा करण्यासाठी गोविंद वल्लभ पंत आणि रंगाचारी यांची नेमणुक केली. १९६० मध्ये लोकसभेत मुंबई द्विभाषीक राज्याचा ठराव मंजूर केला. नवे महाराष्ट्र १ मे १९६० पासुन अस्तित्वात येईल असे जाहीर केले. नव महाराष्ट्रात २६ जिल्हे व २२९ तालुके समाविष्ठ करण्यात आले. अशा प्रकारे मुंबई सह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

१. द्विभाषीक मुंबई राज्याचे १ मे १९६० पासुन महाराष्ट्र व गुजरात असे दोन भाग करण्यात आले.
२. गुजरात मध्ये बनातवाडा, खाबरकाठ, मेहसाणा, कैरा, अहमदाबाद, पंचमहाल, बडोदा, भडोच,सुरत, डांग, अमरेली, जामनगर, राजकोट, जुनागर, कच्छ हे जिल्हे गुजरात मध्ये समाविष्ठकरण्यात आले.

महाराष्ट्र राज्य निर्मितीचा जाहीरनामा

या जाहीर नाम्यानुसार गुजराती भाषिक सर्व जिल्हे गुजरात राज्याला जोडले व द्विभाषीक राहिलेल्या मराठी भाषिक प्रदेश म्हणजे आजचा महाराष्ट्र होय.

१. पुर्वीचे मुंबई राज्यातील १३ जिल्हे महाराष्ट्रात समाविष्ठ करण्यात आले.
२. हैद्राबाद राज्यातील ५ जिल्हे ज्याला मराठवाडा म्हणतात त्याचा समावेश महाराष्ट राज्यातकरण्यात आला.
३. मध्य प्रदेशातील विदर्भाचे ८ जिल्हे महाराष्ट. राज्यात सामील केले.

मुल्यमापन

१९ व्या शतकामध्ये महाराष्ट्रातील समाज परीवर्तन करण्याचे काम, महात्मा फुले, शाहू महाराज, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बापूजी साळुंखे या सारख्या समाज सुधारकांनी केले. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भाषावर प्रांतरचनेचा विरोध असताना मराठी भाषेची अस्मिता जपण्यासाठी एकसंघ अशा महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संयुक्त महाराष्ट्राचा लढा दिला गेला. त्यासाठी १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. एका विशिष्ठ भुप्रदेशात राहणारा, मराठी भाषा बोलणारा मराठी समाज आहे. यातुनच मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या भागातील जनतेला संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची ओढ लागली व संयुक्त महाराष्ट्र निर्मितीही चळवळ सुरु झाली. १ मे. १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला

यश प्राप्त झाले व नव महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्रीय जनतेच्या या प्रादेशिक व भाषिक अस्मितेला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीने एक स्वतंत्र अधिष्ठान प्राप्त झाले.

१२ मे १९४६ पासुन सुरु केलेली संयुक्त महाराष्ट्राची मागणी अनेकांच्या परिश्रमातुन, बलिदानातुन १ मे १९६० रोजी पूर्ण झाली. अशाप्रकारे (१३ + ५ + ८) २६ जिल्हे महाराष्ट्र राज्यात समाविष्ठ केले. महाराष्ट्राचे शिल्पकार, यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणुन शपथ घेतली. आज महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगतशील राज्य म्हणुन ओळखले जाते.

संदर्भ साधने


१. डॉ. एस. जी. जाधव (२००५), आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८ ते १९६०) संस्कृती पुस्तकालय, प्रथमावृत्ती, नांदेड .

३) प्राचार्य आण्णासाहेब गरूड व प्राचार्य बी.बी. सावंत (१९९५), महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास (१८१८ ते १९५०), कैलास पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती,औरंगाबाद.

४) य. दी. फडके, (२००५), विसाव्या शतकातील महाराष्ट्र, के. सागर पब्लिकेशन्स, द्वितीय आवृत्ती, पुणे.

५) प्रा. व्ही. बी. पाटील (२००४), विसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती पुणे.

६) डॉ. किशोरकुमार गव्हाने व डॉ. एस. पी. शिंदे (२०१४), महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स अँन्ड डिस्ट्रिब्युटर्स, प्रथमावृत्ती , औरंगाबाद.

७) प्रा. एन. डी. पाटील, प्रा. टी. एस. थोरात, प्रा. डॉ. विश्वनाथ पवार (२०१५), महाराष्ट्रातील समाज सुधारक, फडके प्रकाशन, कोल्हापूर.